दाखल तारीख – १२.१०.२०१७
नोंदणी तारीख – १२.१०.२०१७
निकाल तारीख – २४.०६.२०२६
कालावधी – ०८ व. ०८म.१२ दि.

**कुडाळ येथील दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर), कुडाळ यांचे न्यायालयात**

**ता. कुडाळ, जिल्हा- सिंधुदुर्ग.**

( पिठासीन अधिकारी – जी. ए. कुलकर्णी )

**नियमित दिवाणी दावा नं.१११/२०१७**

**निशाणी क्र.– ५५**

| | | |
|---|---|---|
| १. | **चंद्रकांत तुकाराम महार सोनवडेकर** }<br>**(मयत वारस)** } | |
| १अ. | **श्री.मोहन चंद्रकांत महार सोनवडेकर** }<br>वय–३२ वर्षे, धंदा–शेती } | |
| १ब. | **श्री.अमित चंद्रकांत महार सोनवडेकर** }<br>वय–२९ वर्षे, धंदा–शेती } | |
| १क. | **श्रीम.अश्विनी चंद्रकांत महार सोनवडेकर** }<br>वय–२७ वर्षे, धंदा–घरकाम } | ... **वादी** |
| १ड. | **श्रीम.वनिता चंद्रकांत महार सोनवडेकर** }<br>वय–५५ वर्षे, धंदा–घरकाम }<br>सर्व राहणार–सोनवडे तर्फे हवेली }<br>ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग. } | |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. | **श्री.सखाराम तिळु (टिळू) सोनवडेकर** }<br>वय–५६ वर्षे, धंदा–नोकरी }<br>रा.सोनवडे तर्फे हवेली }<br>ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग } | |

२. **श्रीमती तारामती तुकाराम महार** }
**सोनवडेकर** }
वय–८१ वर्षे, धंदा–घरकाम }
रा.सोनवडे तर्फे हवेली }
ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग }

३. **श्रीमती संध्या सगुण जाधव** }
**(पूर्वाश्रमीची कु.शांती तुकाराम महार** }
**सोनवडेकर)** }
वय–५६ वर्षे, धंदा– घरकाम }
रा.वेतोरे, हरिजनवाडी, }
ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग }

४. **श्रीमती भावना भाई जाधव** }
**(पूर्वाश्रमीची कु.गौरी तुकाराम महार** }
**सोनवडेकर)** }
वय–४६ वर्षे, धंदा–घरकाम }
रा.कणकवली, हरिजनवाडी }
ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग }

५. **श्रीमती शालिनी तुकाराम महार** }
**सोनवडेकर** }
वय– ५१ वर्षे, धंदा–घरकाम }
रा.सोनवडे तर्फे हवेली }
ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग }

**दावा– हक्कप्रस्थापना व कायमची ताकीद होऊन मिळणेकरिता**

---

वादीतर्फे वकिल – श्री.आर.एस.गव्हाणकर
प्रतिवादी क्र. १ तर्फे वकिल – श्री.एस.के.तायशेटे
प्रतिवादी क्र. २ ते ५ करिता – एकतर्फा चौकशी

---

## न्यायनिर्णय

**(घोषणा तारीख– २४.०६.२०२६)**

वादीने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादीविरूध्द हक्कप्रस्थापना, कायमची ताकीद होऊन मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. **वादीचे दाव्यातील थोडक्यात कथन खालीलप्रमाणे –**

गाव मौजे सोनवडे तर्फे हवेली ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग येथील स्थावर मिळकतीचा तपशील–

| अ.नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|---|
| १. | १३२ | ५६ | ०–१०–०<br>पो.ख. ०–११–० | ००–०२ |

३. सदरहू सर्व्हे वर्णनाच्या मिळकती हा या दाव्याचा विषय असून या मिळकतींना या दाव्यामध्ये 'दावा मिळकत' असे संबोधण्यात आलेले आहे.

४. वादी असे कथन करतात की, दावा मिळकत ही मूळची वादी व प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांची वडील तेच प्रतिवादी क्र.२ चे पती मयत श्री.तुकाराम चंद्रोबा महार सोनवडेकर यांच्या मालकी कब्जाभोग्याची मिळकत आहे. वादी व प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांचे वडील तेच प्रतिवादी क्र. २ चे पती मयत झाल्यानंतर वादी व प्रतिवादी क्र.२ ते ५ यांच्या नावाची दावा मिळकत तसेच अन्य काही मिळकतींच्या गाव कागदी सातबारांना फेरफार नं.२५०५ ने नोंद करण्यात आली. दावा मिळकतीमध्ये मालक या नात्याने प्रत्यक्ष कब्जाभोग्य वादी व प्रतिवादी क्र. २ ते ५ यांचेच आहे. दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी क्र.२ ते ५ कुटुंबाने फणस, काजू, माड तसेच आंबा

या उत्पन्न देणाऱ्या झाडांची उपर्जना केलेली आहे. दावा मिळकतीकडे प्रतिवादी क्र.१ अगर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध नाही व त्यामध्ये प्रतिवादी क्र.१ वा अन्य कुणाचे कब्जाभोग्यही नाही.

५. वादी पुढे असे कथन करतात की, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.१ याने दावा मिळकतीपासून जरूर ते अंतर न सोडता तसेच दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करून इमल्याचे बांधकाम केले म्हणून वादी व प्रतिवादी क्र.३ ते ५ यांचे वडील तेच प्रतिवादी क्र.२ चे पती मयत श्री.तुकाराम चंद्रोबा महार सोनवडेकर यांनी मे.कोर्टात प्रतिवादी क्र.१ यास कायमची व आज्ञार्थी ताकीद होणेकरिता रे.दि.मु.नं.१४/२००२ दाखल केलेला होता. सदरचा दावा दि.०६.१०.२००५ रोजी मंजुर करण्यात होऊन प्रतिवादी क्र.१ याने वादीच्या दावा मिळकतीमधील शांततामय कब्जाभोग्यास कोणत्याही प्रकारे हरकती करू नयेत, तसेच कोणत्याही प्रकारे अतिक्रमण करू नये व प्रतिवादी क्र. १ याने अतिक्रमण करून तालुका निरीक्षक (उप अधीक्षक), भूमी अभिलेख कुडाळ यांनी नि.२५ ने मे.कोर्टात दाखल नकाशात दाखविल्याप्रमाणे केलेले बांधकाम आदेश झाल्यापासून तीन महिन्यात त्याचे स्वत:चे खर्चाने होऊन दावा मिळकत पूर्ववत करणेबाबत तसेच अतिक्रमित भागाचा खुला कब्जा वादीस देणेबाबत हुकुम करण्यात आला.

६. वादी पुढे असे कथन करतात की, सदरच्या हुकुमाविरूध्द प्रतिवादी क्र.१ याने मे.जिल्हा न्यायाधीश साहेब, सिंधुदुर्ग ओरोस यांचे कोर्टात रे.दि.अपील नं.१९१/२००५ हे दाखल केले. सदर अपील दि. १९.११.२००६ रोजी असलेल्या लोकन्यायालयामध्ये वादी व

प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांचे वडील तर प्रतिवादी क्र. २ यांचे पती मयत श्री.तुकाराम चंद्रोबा महार सोनवडेकर व प्रतिवादी क्र. १ यांचे दरम्याने झालेल्या तडजोडीस अनुसरून मिटविण्यात आले. सदरच्या तडजोडीत अतिक्रमण करून तसेच नि. २५ च्या नकाशात दर्शविण्यात आलेले बांधकाम तसेच प्रतिवादी क्र. १ यांच्या घराच्या दक्षिण-पूर्व कोपऱ्याच्या हद्दीपासून तीन फुट अंतर तसेच घराच्या पूर्वेकडील भिंतीपासून तीन फुट व प्रतिवादी क्र. १ च्या हिस्सा नं. ५५ या मिळकतीच्या हद्दीपासून तीन फुट अंतर जाण्यायेण्याची वापरात असलेली पायवाट होऊन प्रतिवादी क्र.१ यास जमीन वापरण्याच्या व बांधकाम न हटविणेच्या मोबदल्यापोटी रक्कम रू.२०,०००/- देण्याचे मान्य व कबूल करण्यात आले.

७. वादी पुढे असे कथन करतात की, प्रतिवादी क्र.१ याने महसूल अधिकाऱ्यांशी हातमिळवणी करून गावमौजे सोनवडे तर्फे हवेली, ता.कुडाळ येथील फेरफार क्र. २४०५ ने दावा मिळकतीच्या गावकागदी साताबाराला वादी व प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांचे वडील तेच प्रतिवादी क्र. २ चे पती मयत श्री.तुकाराम चंद्रोबा महार सोनवडेकर यांचे बरोबरीने सहहिस्सेदार म्हणून स्वत:चे नावाची दावा मिळकतीच्या गावकागदी सातबाराला खोडसाळ नोंद करून घेतली. सदर फेरफाराची नोटीस वादी व प्रतिवादी क्र.३ ते ५ यांचे वडील तेच प्रतिवादी क्र.२ चे पती मयत श्री.तुकाराम चंद्रोबा महार सोनवडेकर यांना देण्यात आलेली नव्हती व नाही. गाव मौजे सोनवडे तर्फे हवेली तालुका-कुडाळ येथील फेरफार नं.२४०५ चे मंजुरीविरूध्द वादी व प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांचे वडील तेच प्रतिवादी क्र.२ चे पती मयत श्री.तुकाराम चंद्रोबा महार सोनवडेकर यांनी मे.उपविभागीय अधिकारी (महसूल) कुडाळ यांचे कोर्टात अधिकार अभिलेख अपील नं.

८५/२०१५ दाखल केले. सदरचे अपील दि.२५.०१.२०१६ रोजी चुकीच्या पध्दतीने नामंजूर करण्यात आले.

८. वादी पुढे असे कथन करतात की, वादी व प्रतिवादी क्र. २ ते ५ यांनी बेकायदेशीर व चुकीच्या आदेशाविरूध्द मे.अपील जिल्हाधिकारीसाहेब सिंधुदुर्ग ओरोस यांचे कोर्टात दुसरे अधिकार अभिलेख अपील क्र.१७३/२०१६ दाखल केले. सदरचे अपील देखील बेकायदेशीरपणे व चुकीच्या पध्दतीने दि.०२.०८.२०१७ रोजी नामंजूर करण्यात आले. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ हा दावा मिळकतीमधील वादी कुटुंबाच्या कब्जाभोग्यास तो हरतऱ्हेच्या हरकती करीत आहे. वादी हा दावा मिळकतीमधील माडावरील नारळ काढण्याकरिता गेला असता, प्रतिवादी क्र. १ याने त्यास अन्यायाने प्रतिबंध केला व दावा मिळकतीमध्ये त्याचा देखील हिस्सा आहे तसेच त्याच्या नावाची नोंद दावा मिळकतीच्या सातबाराला झालेली आहे. त्यामुळे वादीने दावा मिळकतीमध्ये पाऊल देखील ठेवायचे नाही अशी त्याने वादीस धमकी दिली.

९. वादी पुढे असे कथन करतात की, दावा मिळकतीच्या गावकागदी सातबारावरील प्रतिवादी क्र. १ च्या नावाच्या खोडसाळ व विनाअंमलपात्र नोंदी व्यतिरिक्त व इमल्या व्यतिरिक्त दावा मिळकतीकडे प्रतिवादी क्र. १ चा कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध नाही व त्यामध्ये त्याचे कब्जाभोग्यही नाही. प्रतिवादी हा आडदांड, बेताल व अविचारी असून बोलल्याप्रमाणे कृती करणारा आहे. प्रतिवादी क्र. १ ने दावा मिळकतीमधील वादी कुटुंबाच्या शांततामय कब्जाभोग्यास स्वत: अगर अन्य कुणाही मार्फत कोणत्याही प्रकारच्या हरकती करू नयेत वा करवू नये अशी त्यास कायमची ताकीद तसेच दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र. २ ते ५ यांच्याच मालकी

कब्जाभोग्याची आहे असा ठराव होऊन, प्रतिवादी क्र. १ ने गावमौजे सोनवडे तर्फे हवेली फेरफार क्र. २४०५ ने दावा मिळकतीच्या गावकागदी सातबाराला वादी व प्रतिवादी क्र.२ ते ५ यांचा सहहिस्सेदार म्हणून करून घेतलेली नोंद ही बेकायदेशीर, चुकीची खोडसाठ आहे व ती वादी व प्रतिवादी क्र. २ ते ५ यांचेवर बंधनकारक नाही अशी हक्कप्रस्थापना होऊन मिळणेकरिता प्रस्तुतचा दावा वादी यांनी दाखल केलेला आहे.

**१०.** प्रस्तुतकामी प्रतिवादी क्र.१ यांना दावा समन्स बजावणी होऊन देखील ते त्यांचे वकिलांमार्फत हजर झालेले असून त्यांनी निशाणी क्र. १४ लगत त्यांची कैफियत दाखल केलेली आहे. प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र.२ ते ५ यांचेविरूध्द दि.०४.१०.२०१८ रोजीच्या निशाणी क्र.१ वरील आदेशान्वये एकतर्फा चालविणेत येत आहे.

**११.** प्रतिवादी क्र. १ यांनी निशाणी १४ वर त्यांचे म्हणणे सादर करुन वादी यांची दाव्यातील कथने नाकारली आहेत. त्यांच्या मते वादीचे वडील तुकाराम चंद्रोबा महार उर्फ सोनवडेकर यांनी प्रतिवादीविरूध्द मे.कोर्टात रे.दि.मु.नं.१४/२००० दावा मिळकती संदर्भात दाखल केला होता तो मंजूर झाला म्हणून प्रतिवादी क्र. १ ते मे.जिल्हा न्यायाधीश सिंधुदुर्ग, ओरोस यांचे कोर्टात रे.दि.अ.नं.१९१/२००५ दाखल केले होते. त्यानंतर सदरचे अपील दि.१९.११.२००६ रोजीच्या लोकअदालत मध्ये ठेवण्यात आले. त्यामध्ये तडजोड होऊन दावा व अपील तडजोडीने मिटविण्यात आले.

**१२.** प्रतिवादी पुढे असे कथन करतात की, त्याप्रमाणे अवॉर्ड देखील झाले. सबब झालेल्या अवॉर्ड प्रमाणे प्रतिवादी क्र. १ ने मे.कोर्टात दि.१४.१२.२००६ रोजी रू.२०,०००/-

(वीस हजार मात्र) मुदतीत भरणा केले. मे.जिल्हा न्यायालयातील हुकुम अंतिम झाला आहे. वादीस दावा दाखल करण्याचा हक्कच प्राप्त नाही. वादीने झालेल्या अवॉर्ड विरूध्द प्रथम उच्च न्यायालयात दाद मागणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र. १ ने जमा केलेली रक्कम वादीचे वडील तुकाराम चंद्रोबा सोनवडेकर याने मे.कोर्टातून दि.०८.०२.२००८ रोजी स्वत: अर्ज दाखल करून स्वीकारलेली आहे. वादीस कोणताही हक्क ६६ चौ.मी क्षेत्राकडे उभारता येणार नाही.

१३. प्रतिवादी पुढे असे कथन करतात की, प्रतिवादी क्र. १ ने अवॉर्डप्रमाणे त्यानंतर तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचेकडे रितसर अर्ज दाखल करून वादी कुटुंबासमक्ष मोजणी करून घेतली आणि त्याप्रमाणे ६६ चौ.मी क्षेत्र तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कुडाळ यांनी पक्के करून हद्द निश्चिती वादी व प्रतिवादी समक्ष केली आहे. त्यावेळी सदर मोजणीस वादी व त्याचे वडील तुकाराम यांनी कधीही हरकत उभारलेली नाही. दि.१८.०१.२००८ रोजीची मोजणी अंतिम झाली आहे. वादीस ६६ चौ.मी क्षेत्राकडे आता हक्क उपस्थित करता येणारा नाही. ६६ चौ.मी क्षेत्र वगळता दावा मिळकतीकडे प्रतिवादी क्र. १ ने कधीही हक्कसंबंध उभारलेली नाही. सदरचे क्षेत्र वादी कुटुंबाने आणि प्रतिवादी क्र. १ ने तडजोडीने अपील निकालाची झाल्यामुळे प्रतिवादी क्र.१ यास बहाल केले व त्याकरिता मोबदला किंमत रू.२०,०००/– (वीस हजार मात्र) स्विकारले. सदरचा करार तथा पुरशीस वादीवर बंधनकारक आहे. त्यास दाव्याद्वारे हरकत उभारता येणारी नाही.

१४. प्रतिवादी पुढे असे कथन करतात की, वादीने प्रथम उपविभागीय अधिकारी महसूल कुडाळ यांचेकडे अपील दाखल केले ते फेटाळल्यानंतर मा.जिल्हाधिकारी यांचेकडे दुसरे

अपील दाखल केले तेही फेटाळले गेले. सदरचे अपील देखील वादी कुटुंबाने मुदतीत दाखल केले नव्हते ते विलंबाने दाखल केले. अपिल सुमारे ८ वर्षाचा विलंब माफ न होता दाखल करून घेण्याच्या मुद्दयावर फेटाळण्यात आले आहे. त्याविरूध्द महाराष्ट्र लॅण्ड रेव्हीन्यू कोड मधील तरतुदींवर हुकुम अपील रिव्हीजन केलेले नाही आणि याबाबत वादीने दाव्यात अवाक्षर ही काढलेले नाही. अशा प्रकारचा दावा वादीस दाखल करता येणारा नाही. प्रतिवादीच्या हक्कसंबंधामुळे त्याला बाधा येते म्हणून त्याने अशाप्रकारचा दावा दाखल करून केवळ प्रतिवादी क्र. १ यास त्रासात घालण्याचा प्रयत्न आहे. वादीने मोबदला म्हणून रक्कम रू.२०,०००/- (वीस हजार मात्र) स्विकारलेली असल्याने त्यास दावा दाखल करून प्रतिवादी क्र. १ यास नाहक त्रास देण्याचा हक्क प्राप्त नाही. सबब वादीचा दावा खर्चासही फेटाळण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

**१५.** वादी व प्रतिवादी क्र.१ तर्फे विद्वान विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकण्यात आलेला आहे.

**१६.** वादी व प्रतिवादी क्र.१ यांची कथने विचारात घेवुन निशाणी क्र. १५ सोबत पुढीलप्रमाणे मुद्दे नोंद केलेले असुन त्यावरील निष्कर्ष व कारणमिमांसा मी पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र. २ ते ५ यांची मालकी हक्काने कब्जे वहिवाटीस असल्याचे वादी सिध्द करतात काय ? | **नाही** |

| | | |
|---|---|---|
| **२.** | प्रतिवादी क्र. १ यांनी वादी व प्रतिवादी क्र.२ ते ५ यांचे दावा मिळकतीमधील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा केल्याचे वादी सिध्द करतात काय ? | **नाही** |
| **३.** | प्रतिवादी क्र. १ यांनी दावा मिळकतीच्या सातबारा पत्रकी वादी व प्रतिवादी क्र. २ ते ५ यांचा सहहिस्सेदार म्हणून नावाची करून घेतलेली नोंद बेकायदेशीर व चुकीची असलेबाबतचा ठराव वादीच्या हक्कात होऊन मिळणेस वादी पात्र आहेत काय ? | **नाही** |
| **४.** | वादी व प्रतिवादी क्र. २ ते ५ यांचे दावा मिळकतीमधील कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करू नये अशी निरंतर मनाई ताकीद प्रतिवादी क्र. १ यांचेविरूध्द होऊन मिळणेस वादी पात्र आहेत काय ? | **नाही** |
| **५.** | अंतिम आदेश व हुकुमनामा काय? | **अंतिम आदेशानुसार** |

**१७.** प्रस्तुतकामी वादीने दावा अर्जातील कथने शाबीत करणेकरिता साक्षीदार तपासले असून निशाणी क्र. २८ पुरशिसप्रमाणे त्यांचा पुरावा बंद केलेला आहे.

| अनु.क्र. | साक्षीदारांचे नावे | निशाणी |
|---|---|---|
| १ | वनिता चंद्रकांत महार सोनवडेकर | २३ |

**१८.** प्रस्तुतकामी वादीतर्फे पुढीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा सादर करणेत आलेला आहे.

| अनु.क्र. | कागदपत्रके | निशाणी |
|---|---|---|
| १. | गाव मौजे सोनवडे तर्फे हवेली येथील सर्व्हे नं.१३२ हिस्सा नं.५६ चा सातबारा उतारा | ५ |
| २. | गाव मौजे सोनवडे तर्फे हवेली येथील फेरफार क्र. २५०५ चा उतारा | २५ |

| | | |
|---|---|---|
| ३. | गाव मौजे सोनवडे तर्फे हवेली येथील फेरफार क्र.२४०५ च्या उताऱ्याची सहीसुद नक्कल | २६ |
| ४. | रे.दि.अ.नं.१९१/२०१५ मधील निशाणी १८ ची सहीसुद नक्कल | २७ |

**१९.** प्रस्तुतकामी प्रतिवादीने दावा अर्जातील कथने शाबीत करणेकरिता पुढीलप्रमाणे साक्षीदार तपासला आहे. प्रतिवादी यांना पुरेशी संधी देवूनही त्यांनी पुढील साक्षीदार घेतला नसल्याने दि.१०.०२.२०२६ रोजीच्या निशाणी क्र. ०१ वरील आदेशाप्रमाणे त्यांचा पुरावा बंद केलेला आहे.

| **अनु.क्र.** | **साक्षीदारांचे नावे** | **निशाणी** |
|---|---|---|
| १. | सखाराम टिळु सोनवडेकर | ३० |

**२०.** प्रस्तुतकामी वादीतर्फे पुढीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा सादर करणेत आलेला आहे.

| **अनु.क्र.** | **कागदपत्रके** | **निशाणी** |
|---|---|---|
| १. | जिल्हा न्यायालय सिंधुदुर्ग–ओरोस रे.दि.अ.नं.१९१/२००५ मधील निशाणी १६ ची सहीसूद नक्कल | ३४ |
| २. | जिल्हा न्यायालय सिंधुदुर्ग–ओरोस रे.दि.अ.नं.१९१/२००५ मधील निशाणी १७ ची सहीसूद नक्कल | ३५ |
| ३. | जिल्हा न्यायालय सिंधुदुर्ग–ओरोस रे.दि.अ.नं.१९१/२००५ मधील निशाणी १८ ची सहीसूद नक्कल | ३६ |
| ४. | जिल्हा न्यायालय सिंधुदुर्ग–ओरोस रे.दि.अ.नं.१९१/२००५ मधील निशाणी १९ ची सहीसूद नक्कल | ३७ |

| | | |
|---|---|---|
| ५. | जिल्हा न्यायालय सिंधुदुर्ग–ओरोस रे.दि.अ.नं.१९१/२००५ मधील निशाणी २० ची सहीसूद नक्कल | ३८ |
| ६. | जिल्हा न्यायालय सिंधुदुर्ग–ओरोस रे.दि.अ.नं.१९१/२००५ मधील अवॉर्ड रक्कम भरणा करणेसाठी दिलेल्या अर्जाची सहीसूद नक्कल | ३९ |
| ७. | जिल्हा न्यायालय सिंधुदुर्ग–ओरोस रे.दि.अ.नं.१९१/२००५ मधील अवॉर्डप्रमाणे भरलेली रक्कम वादीने स्विकारलीबाबत जिल्हा न्यायालयाने दिलेल्या नोंदवहीची सहीसूद नक्कल | ४० |

–::– **कारणमिमांसा** –::–

**मुद्दे क्र.१ व ३ करीता:–**

**२१.** दिवाणी दावा शाबीत करण्यासाठी संभाव्यतेची प्राधान्यता (preponderance of probability) चे तत्व लागू होते. भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ कलम ३ मध्ये 'शाबीत' ची व्याख्या दिली आहे ती इथे वाचणे महत्त्वाचे ठरते.

**'शाबीत'** – *जेव्हा आपणांपुढील बाबींचा विचार केल्यानंतर, एखादे तथ्य अस्तित्वात आहे असा न्यायालयाचा समज होतो किंवा व्यवहारदृष्टी असलेल्या माणसाने ते अस्तित्वात आहे अशा समजुतीने त्या विशिष्ट प्रकरणाच्या परिस्थितीत वागायला हवे इतके त्याचे अस्तित्व न्यायालयाला संभवनीय वाटते तेव्हा, ते 'शाबीत' झाले असे म्हटले जाते.*

**२२.** भारतीय पुरावा अधिनियम १८७२ कलम १०१ नुसार **'शाबीतीचा भार'** पुढे दिलेल्या व्यक्तीवर असतो– *जो कोणी स्वतः प्रपादन केलेल्या तथ्यांच्या अस्तित्वावर अवलंबुन असलेल्या कोणत्याही वैध अधिकाराबाबत किंवा दायित्वाबाबत न्यायनिर्णय देण्यास कोणत्याही,*

*न्यायालयाला आवाहन करील, त्याने ती तथ्ये अस्तित्वात असल्याचे शाबीत केले पाहिजे.*

वरील कायद्याच्या तरतुदीवरुन हे स्पष्ट होते की, वादीने प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे दावा मिळकतीमधील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा केल्याची बाब सिध्द करणे गरजेचे आहे.

**२३.** वादी व प्रतिवादीतर्फे विद्वान विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी त्यांची केस शाबीत करणेकरिता वादी साक्षीदार क्र.१ वनिता महार सोनवडेकर यांची साक्ष निशाणी २३ वर नोंदविलेली आहे. सदर साक्षीदाराने दाव्यातील सर्व कथानांचा पुनरूच्चार त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्रामध्ये केलेला आहे. सदर साक्षीदाराचे साक्षीचे अवलोकन केले असता, दावा मिळकत सर्व्हे क्र. १३२ हिस्सा क्र. ५६ याचे एकूण क्षेत्र ११ गुंठे असून त्यापैकी काही क्षेत्रात प्रतिवादी क्र. १ यांनी अतिक्रमण केल्याने वादीचे वडील म्हणजेच तुकाराम चंद्रोबा महार सोनवडेकर यांनी प्रतिवादी क्र.१ यांचेविरूध्द यापूर्वी रे.दि.मु.नं.१४/२००० चा दावा दाखल केला होता. सदरचा दावा मा.कुडाळ येथील दिवाणी न्यायाधीश यांनी मंजूर केल्याने प्रतिवादी क्र. १ यांनी त्याविरूध्द रे.दि.अ.क्र.१९१/२००५ चे अपील मा.जिल्हा न्यायालय सिंधुदुर्ग यांचे न्यायालयात दाखल केला होता. सदर अपीलाचे कामी त्या अपीलातील अपीलकर्ता म्हणजेच प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. १ व सदर अपीलातील प्रतिवादी म्हणजेच या दाव्यातील वादीचे वडील चंद्रकांत सोनवडेकर यांचेदरम्यान दि.१९.११.२००६ रोजी झालेल्या लोक न्यायालयामध्ये आपसात तडजोड झाली. सदरची बाब प्रस्तुत दाव्यातील साक्षीदार क्र.०१ यांनी कबूल केलेली आहे. तसेच रे.दि.मु.नं.१४/२००० चे कामी असलेले वादी तुकाराम सोनवडेकर यांचेवतीने सदर

दाव्यात साक्षीदार क्र.१ वनिता सोनवडेकर यांनी कुलमुखत्यार म्हणून काम पाहिल्याचे देखील सदर साक्षीदाराने कथन केलेले आहे.

२४. वादी साक्षीदार क्र.०१ यांचे निशाणी २३ वरील उलटतपासाचे अवलोकन केले असता, रे.दि.अ.क्र.१९१/२००५ चे कामी वादी व प्रतिवादी क्र.१ यांचेदरम्यान लोक न्यायालयामध्ये आपसात तडजोड होऊन प्रतिवादी क्र.१ यांचे प्रस्तुत दाव्यातील दावा मिळकतीचे बांधकाम आहे तसे ठेऊन सदर बांधकामाच्या चारही दिशांना ३ फुट जागा सोडायची व जाण्या येण्याची पायवाट सोडायची व त्याकरिता प्रतिवादी क्र. १ यांनी वादी यांना सदर लोक न्यायालयातील आदेशाच्या दिनांकापासून ४० दिवसांच्या आत रक्कम रूपये २०,०००/– देण्याचे मान्य केले होते. तसेच दावा मिळकतीची मोजणी करताना वादी व प्रतिवादी क्र. १ यांनी मोजणीचा खर्च निम्मा निम्मा करून घेण्याचे देखील ठरले होते. त्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ यांनी रक्कम रूपये २०,०००/– दि.१४.१२.२००६ रोजी मा.जिल्हा न्यायालयात जमा केली असून ती रक्कम वादी यांचे वडील तुकाराम सोनवडेकर यांनी दावा मिळकतीची दि.१८.०१.२००८ रोजी मोजणी झाल्यानंतर मा.जिल्हा न्यायालयात अर्ज देऊन हाती घेतलेली आहे. त्यानंतर दावा मिळकतीबाबत फेरफार क्र.२४०५ मंजूर होऊन प्रतिवादी क्र.१ चे नाव दावा मिळकतीचे सातबारा पत्रकी ६६ चौ.मी.क्षेत्रास नमूद झाल्याची बाब सदर साक्षीदार कबूल करत आहे.

२५. वादी यांनी प्रतिवादी क्र.१ यांचेविरूध्द दाखल केलेल्या प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता, वादी यांनी प्रतिवादी क्र.१ यांचेविरूध्द यापूर्वी दाखल केलेल्या दाव्याची व त्यावरील अपीलाची तसेच अपीलाचे कामी झालेल्या लोक न्यायालयातील तडजोडीबाबत

मजकुर नमूद केलेला आहे. परंतु, वादी यांनी त्यांचे प्रस्तुत दाव्याचे कामी प्रतिवादी क्र. १ यांनी लोकन्यायालयात झालेल्या तडजोडीची पूर्तता केली किंवा नाही याबाबतचा कोणताही मजकुर नमूद केलेला नाही. यावरून वादी यांनी महत्त्वाची बाब त्यांचे दाव्यामध्ये नमूद केली नसल्याचे दिसून येत आहे.

**२६.** अभिलेखावरील दाखल अपील क्र.१९१/२००५ मधील निशाणी ३४ लोक न्यायालय नियमावली प्रमाणे असणारा फॉर्म ई, निशाणी ३५ वरील तडजोड मेमो, निशाणी ३६ वरील तडजोड हुकुमनामा, निशाणी ३७ वर सदर अपीलाचे कामी असलेले फॉर्म आय, निशाणी ३८ वर सदर अपीलाचे कामी वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान झालेली संयुक्त तडजोड पुरशिस, निशाणी ३९ वर रे.दि.अ.क्र.१९१/२००५ मधील अपीलकर्ता म्हणजेच प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. १ यांनी मा.जिल्हा न्यायालयात रक्कम रूपये २०,०००/– दि.१४.१२.२००६ रोजी भरले असलेबाबतचा अर्ज व त्यावरील शेरा, निशाणी ४० वर अपीलाचे कामी असलेले प्रतिवादी म्हणजेच प्रस्तुत दाव्यातील वादी यांनी सदर रक्कम स्विकारली असल्याबाबतचा मा.जिल्हा न्यायालय यांचेकडील नमुना ड ची सही शिक्कयाची नक्कल अभिलेखावर सादर केलेली आहे.

**२७.** अभिलेखावरील दाखल मा.जिल्हा न्यायालय सिंधुदुर्ग–ओरोस यांचे न्यायालयातील रे.दि.अ.क्र.१९१/२००५ चे कामी असलेले निशाणी ३४ ते ४० वरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र.१ यांनी लोक न्यायालयादरम्यान झालेल्या आपसात तडजोडीनुसार आदेशाची अंमलबजावणी केल्यानंतर दावा मिळकतीबाबत फेरफार क्र.

२४०५ मंजूर झाल्याचे दिसून येत आहे. सदर नोंदीबाबत वादीतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी युक्तीवाद करताना असे कथन केले की, मा.ना.उच्च न्यायालय यांचे विविध न्यायनिवाडयातील निष्कर्षांप्रमाणे सातबारा उताऱ्यास असलेली नोंद ही आर्थिक उद्देशाने केलेले असून त्या नोंदीमुळे एखाद्या व्यक्तीची दावा मिळकतीमधील कब्जेवहिवाट ठरविता येणार नाही. त्यामुळे दावा मिळकतीस प्रतिवादी क्र.१ यांच्या नावाची झालेली नोंद ही चुकीची असून त्यामुळे प्रतिवादी क्र. १ यांची दावा मिळकतीमध्ये कब्जे वहिवाट आहे असे म्हणता येणार नाही. परंतु, निशाणी २६ वरील फेरफार क्र. २४०५ चे अवलोकन केले असता, मा.जिल्हा न्यायालय यांचे न्यायालयातील अपील क्र.१९१/२००५ मधील निकालाप्रमाणे ६६ चौ.मी क्षेत्र सखाराम टिळु सोनवडेकर यांना रक्कम रूपये २०,०००/– न्यायालयात भरणा केल्याने वरील क्षेत्राचा ताबा दिला, असे नमूद केलेले आहे. यावरून फेरफार क्र. २४०५ प्रमाणे प्रतिवादी क्र. १ यांच्या नावची नोंद दावा मिळकतीचे सातबारा पत्रकी ६६ चौ.मी. क्षेत्रास चुकीने झाल्याचे असे म्हणणे न्यायोचित होणार नाही.

२८. अभिलेखावरील दाखल प्रतिवादी क्र. १ यांचे निशाणी ३० वरील साक्षीचे अवलोकन केले असता, दावा मिळकतीचे सातबारा पत्रकी ६६ चौ.मी. क्षेत्रास झालेली नोंद चुकीची असल्याची बाब प्रतिवादी यांनी नाकारलेली आहे. निव्वळ प्रतिवादी क्र. १ यांना त्यांचे हिश्श्यास मा.जिल्हा न्यायालयातील लोकन्यायालयामध्ये झालेल्या आपसात तडजोडीप्रमाणे आलेल्या क्षेत्राची लांबी व रूंदी स्पष्टपणे सांगता येत नाही. त्यामुळे त्यांच्या ताब्यामध्ये दावा मिळकतीमधील ६६ चौ.मी. क्षेत्र नसल्याचे म्हणणे योग्य होणार नाही. दावा मिळकतीमध्ये

प्रतिवादी क्र.१ यांची ६६ चौ.मी. क्षेत्रास मालकी व कब्जेवहिवाट नसल्याची बाब सिध्द करण्याची जबाबदारी वादी यांचेवर असल्याचे दिसून येते.

२९. वादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचे साक्षीचे अवलोकन केले असता, सदर फेरफार क्र. २४०५ विरूध्द रे.दि.मु.नं.१४/२००० मधील वादी म्हणजेच प्रस्तुत प्रकरणातील वादीचे वडील तुकाराम चंद्रोबा महार सोनवडेकर यांनी कोणतीही दाद मागितलेली नाही. परंतु त्यांचे वारसदार म्हणजेच प्रस्तुत दाव्यातील वादी म्हणजेच चंद्रकांत तुकाराम सोनवडेकर यांनी प्रतिवादी क्र. १ यांचेविरूध्द प्रस्तुत दावा सन २०१७ मध्ये दाखल करून दावा मिळकतीमधील प्रतिवादी क्र. १ यांच्या नावची झालेली नोंद चुकीची असल्याचे कथन केलेले आहे. यावरून मा.जिल्हा न्यायालय यांचे न्यायालयात रे.दि.अ.क्रमांक १९१/२००५ मधील लोक न्यायालयाचे कामी झालेल्या आपसात तडजोडीबाबत सदर अपीलातील वादी म्हणजेच प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. १ व सदर अपीलातील प्रतिवादी म्हणजेच प्रस्तुत दाव्यातील वादीचे वडील तुकाराम सोनवडेकर यांची कोणतीही हरकत नसल्याचे दिसून येते.

३०. अभिलेखावरील दाखल साक्षीपुराव्यांचे अवलोकन केले असता, दावा मिळकतीस प्रतिवादी क्र.१ यांची फेरफार क्र.२४०५ प्रमाणे झालेली नोंद पाहता, ती रे.दि.अ.क्र.१९१/२००५ मधील मा.जिल्हा न्यायालयातील लोक न्यायालयामध्ये झालेल्या आपसात तडजोड हुकुमनाम्यातील आदेशाची पूर्तता झाल्यानंतर करण्यात आली असल्याचे दिसून येत आहे. वादी यांनी त्यांचे दाव्याचे कामी प्रतिवादी क्र. १ यांनी रे.दि.अ.क्र.१९१/२००५ मधील हुकुमनाम्याची पूर्तता प्रतिवादी क्र. १ यांनी केली नाही म्हणून त्यांच्या नावची झालेली

६६ चौ.मी.क्षेत्राची झालेली नोंद रद्द होऊन मिळावी अशी मागणी केली नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांच्या नावाची दावा मिळकतीमधील ६६ चौ.मी क्षेत्रास झालेली नोंद कशाप्रकारे बेकायदेशीर आहे ही बाब वादी यांनी सिध्द केली नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी क्र. २ ते ५ यांची दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. १ यांचे मालकी वहिवाटीचे ६६ चौ.मी इतके क्षेत्र सोडुन कब्जे वहिवाट असल्याची बाब दिसून येते. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ यांनी दावा मिळकतीच्या सातबारा पत्रकी वादी व प्रतिवादी क्र. २ ते ५ यांचे सहहिस्सेदार म्हणून करून घेतलेली नोंद बेकायदेशीर व चुकीची असल्याची बाब वादी यांनी सिध्द केली नसल्याने तसा ठराव वादीच्या हक्कात देणे न्यायोचित होणार नाही. त्यामुळे मी मुद्दे क्र. १ व ३ चे उत्तर ***'नकारार्थी'*** नोंदवित आहे.

**मुद्दे क्र. २ व ४ करिता:–**

**३१.** वर नमूद कारणमिमांसेचा एकत्रित विचार करता, दावा मिळकतीचे सातबारा पत्रकी प्रतिवादी क्र.१ यांच्या नावाची नोंद ६६ चौ.मी क्षेत्रास मा.जिल्हा न्यायालय ओरोस यांचे न्यायालयातील रे.दि.अ.क्र.१९१/२००५ चे कामी वादी, प्रतिवादी क्र.२ ते ५ व प्रतिवादी क्र.१ यांचेदरम्यान झालेल्या लोक न्यायालयातील आपसात तडजोडीप्रमाणे झालेली असून प्रतिवादी क्र.१ यांनी सदर तडजोडीप्रमाणे ठरलेल्या नियम व अटींची पूर्तता केली असल्याचे अभिलेखावरील दाखल साक्षीपुराव्यांवरून दिसून येत आहे. त्यामुळे दावा मिळकतीचे सातबारा पत्रकी प्रतिवादी क्र.१ यांची झालेली नोंद ही कायदेशीर असल्याचे दिसून येत आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ यांनी वादी व प्रतिवादी क्र.२ ते ५ यांचे दावा मिळकतीमधील शांततामय कब्जे

वहिवाटीस कशाप्रकारे हरकत अडथळा केला ही बाब वादी यांनी सबळ पुराव्यानिशी अभिलेखावर आणली नसल्याने मनाई सारखी नैसर्गिक दाद त्यांचे हक्कात मिळणेस वादी पात्र नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मी मुद्दे क्र. २ व ४ चा निष्कर्ष ***'नकारार्थी'*** नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ५ करिता:-**

**३२.** वादी, प्रतिवादी क्र.२ ते ५ व प्रतिवादी क्र.१ यांचे दरम्यान रे.दि.अ.क्र. १९१/२००५ चे कामी लोक न्यायालयामध्ये आपसात तडजोड होऊन सदर प्रकरणातील तडजोड हुकुमनाम्यातील अटी व शर्तींची पूर्तता प्रतिवादी क्र.१ यांनी करून देखील वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र.१ यांचेविरूध्द दाखल केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांना प्रस्तुत दाव्यास सामोरे जावे लागल्याने प्रस्तुतचा दाव्याचा खर्च प्रतिवादी क्र.१ यांना मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सबब मी मुद्दा क्र. ५ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. दावा खर्चासह नामंजूर करणेत येत आहे.

२. येणेप्रमाणे हुकुमनामा करणेत यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

सही/-

[ जी.ए. कुलकर्णी ]

दिनांक-२४.०६.२०२६.

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ.